# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## क क्षेत्रीय कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक-९
## सभावृत्तांत

दि.- ०४/११/२०१५ वेळ –दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्याक प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०४/११/२०१५ रोजी दुपारी ३:०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.ननवरे जितेंद्र बाबा
३) मा.सावळे सिमा रविंद्र
४) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा.कदम सदगुरु महादेव
७) मा.कैलास महादेव कदम
८) मा.शितोळे शैलजा बाबुराव
९) मा.जगताप नवनाथ दत्तु
१०) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
११) मा.प्रशांत शितोळे
११) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१२) मा.शेंडगे आशा सुखदेव
१३) मा.संजय केशवराव काटे
१४) मा.सतिश सदाशिव काटे स्वीकृत सदस्य
१५) मा.गणेश आनंदराव ढोरे ------"--------
१६) मा.हमीद नवाब शेख ------"--------

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.जावळे -उपअभियंता (पापु), श्री.क्षिरसागर-कनिष्ठ अभियंता स्थापत्य, मा.बोत्रे- उपअभियंता स्थापत्य, मा.सोनवणे- उपअभियंता विदयुत, मा.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी,मा.उगले-लेखाधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१) रस्त्याला नांव देणेबाबत-मा.नवनाथ जगताप, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) प्रभाग क्र.६२ मधील "स्वातंत्र्य सैनिक रामभाऊ काटे उड्डाणपुल" अशी कमान लावणेबाबत - मा.सतिश काटे, मा.नवनाथ जगताप मा,प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) प्रभाग क्र.६२ रामभाऊ काटे उड्डाणपुलाखालील मोकळी जागा पार्कींगसाठी उपलब्ध करुन देणेबाबत- मा.सतिश काटे, मा.प्रशांत शितोळे, मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) प्रभाग क्र.६२ मधील **आई उदयान** मध्ये कायमस्वरुपी सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत- मा.सतिश काटे, मा.प्रशांत शितोळे, मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) मनपा अंदाजपत्रकातील रक्कम दुरुस्तीबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) हुतात्मा भगतसिंह शाळेच्या आवारातील संडास ब्लॉक दुमजली करणेबाबत- मा.रमाताई ओव्हाळ, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) रस्त्याचे नामकरण करणेबाबत- मा.रमाताई ओव्हाळ,मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

दि.०७/१०/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- १४८ विषय क्रमांक- १

दिनांक- ४/११/२०१५ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे

संदर्भ- मा.नवनाथ जगताप, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

नवी सांगवी वार्ड क्र.५८ येथील संत तुकारामनगर मधील गल्ली क्र.१ या रस्त्यास **"कै.तुकाराम गेणुभाऊ ढोरे पाटील मार्ग",** क्रांती चौक ते फेमस चौक रोडला **"महालक्ष्मी रोड"** क्रांती चौक ते कृष्णा चौक या रोडचे **"श्री.गणेश सहकारी बँक रोड"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभागातील खालील चौकांचे फलक लावण्यात यावे. त्यात एम.के.हॉटेल चौक,क्रांती चौक, फेमस चौक,वाघजाई चौक,साई चौक,कृष्णा चौक,शनि मंदीर चौक असे नामफलक त्वरीत लावण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------

ठराव क्रमांक- १४९ विषय क्रमांक- २

दिनांक- ४/११/२०१५ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे

संदर्भ- मा.सतिश काटे, मा.नवनाथ जगताप, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ दापोडी येथील **"स्वातंत्र्य सैनिक रामभाऊ काटे उड्डाणपुल"** येथे पालिकेकडुन पुणे मुंबई रोड व गणेशनगर या दोन्ही बाजुने सुशोभित अशी नावाची कमान व दिशादर्शक फलक बसवण्यात यावा. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १५० विषय क्रमांक- ३

दिनांक- ४/११/२०१५ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे

संदर्भ- मा.सतिश काटे, मा.नवनाथ जगताप, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ दापोडी येथील **"स्वातंत्र्य सैनिक रामभाऊ काटे उड्डाणपुला"** खालील मोकळी जागा अतिक्रमण बाधीत होत असुन सदर जागा अतिक्रमणमुक्त करुन पार्कींगसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १५१ विषय क्रमांक- ४

दिनांक- ४/११/२०१५ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे

संदर्भ- मा.सतिश काटे, मा.नवनाथ जगताप, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ दापोडी येथील "**आई उदयान**" मध्ये पालिकेकडुन आजपर्यंत लाखो रुपये खर्च केले आहेत परंतु या उदयानाला आजपर्यंत सुरक्षा रक्षक नेमलेले नाहीत त्यामुळे उदयान रात्रंदिवस उघडे असुन त्यामुळे उदयानाचे मोठया प्रमाणात तोडफोड व नुकसान होत आहे.त्यामुळे दापोडी आई

उदयान येथे कायमस्वरुपी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १५२ विषय क्रमांक- ५
दिनांक- ४/११/२०१५ विभाग-
सुचक- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.किरण मोटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे , मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६० सांगवी येथील चंद्रमणीनगर येथे रबर मोल्डेड पेव्हींग ब्लॉकची कामे करणेचे काम मनपा अंदाजपत्रक २०१५-१६ मध्ये पान क्र.१६८ अ.क्र.६९/अ नमुद केले आहे.परंतु सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत शुन्यचा उल्लेख झाला आहे तरी याठिकाणी तरतुद उपलब्ध असुन तरतुदीच्या दुप्पट म्हणजे र.रु.५०,००,०००/- ( अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) अंदाजपत्रकीय रक्कम करण्यात यावी व सदर ठराव मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १५३ विषय क्रमांक- ६
दिनांक- ४/११/२०१५ विभाग-
सुचक- मा. रमाताई ओव्हाळ अनुमोदक- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ- मा.रमाताई ओव्हाळ , मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६१ दापोडी हुतात्मा भगतसिंह शाळेच्या आवारात जुना संडास ब्लॉक आहे. लोकवस्ती वाढल्यामुळे सदरचा संडास ब्लॉक अपुरा पडत आहे. तरी त्याठिकाणी नवीन दुमजली संडास ब्लॉक बांधण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १५४ विषय क्रमांक- ७
दिनांक- ४/११/२०१५ विभाग-
सुचक- मा. रमाताई ओव्हाळ अनुमोदक- मा.शैलजा शितोळे
संदर्भ- मा.रमाताई ओव्हाळ , मा. शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६१ दापोडी मध्ये माजी नगरसेवक अविनाश काटे यांच्या निवासस्थाना शेजारील व हुतात्मा भगतसिंह विदयालय सिमाभिंती शेजारील महात्मा फुलेनगर कडे जाणाऱ्या रस्त्यास "**कालकथित उत्तम धर्मा गुजर मार्ग**" असे नामकरण करण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६



जा.क्र.कक्षेका/कावि/सभा/ १५६/२०१५
दिनांक- ०४/११/२०१५

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा) क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.